www.maharashtratimes.com

मटा +TOI : पुण्यात नंबर १

# महाराष्ट्र टाइम्स

आज अक्षय्य तृतीया

पुणे । मंगळवार, ७ मे २०१९ । पाने १८ (पुणे प्लससह) । शहर आवृत्ती । ₹ ४.००

# 'सीबीएसई'त पुण्याची बाजी

## पुणे, पिंपरी-चिंचवडमधील बहुसंख्य शाळांचा शंभर टक्के निकाल

म. टा. प्रतिनिधी, पुणे

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) दहावीच्या परीक्षेच्या निकालात पुण्यातील शाळांनी शंभर नंबरी यश मिळवले आहे. पुणे तसेच पिंपरी चिंचवड परिसरातील बहुसंख्य शाळांचा निकाल शंभर टक्के लागला असून, अनेक विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवले आहेत.

ज्ञानप्रबोधिनी प्रशालेचा निकाल १०० टक्के लागला आहे. शाळेच्या विद्यार्थ्यांना सरासरी ९२.०५ टक्के गुण मिळाले असून, हा नवा विक्रम असल्याची माहिती प्राचार्य डॉ. मिलिंद नाईक यांनी दिली. परीक्षा दिलेल्या ८० पैकी ६१ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळाले आहे. स्पृहा सरनाईकने ९८.२ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. आभा मराठे हिने ९७.८ टक्के गुण मिळवून द्वितीय, तर रेवती दिवेकर हिने ९७.६ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. २८ विद्यार्थ्यांनी संस्कृतमध्ये, पाच विद्यार्थ्यांनी सामाजिक शास्त्रात, एकाने गणितात तर, दोघांनी विज्ञानात पैकीच्या पैकी गुण मिळवले.

पुणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी ई-लर्निंग स्कूलचा दहावीचा निकाल सलग पाचव्या वर्षी शंभर टक्के लागला आहे. सृष्टी चिंतल हिने ८७ टक्के, आदर्श दोंतुल याने ८२.८ टक्के, तर प्रियांका मिसाळ ८२.६ टक्के गुण मिळवले. वानवडी येथील सिटी इंटरनॅशनल स्कूलचा निकाल १०० टक्के लागला आहे. जान्हवी हृषीकेश हिने ९७.४ टक्के गुण (गणितात १०० पैकी १००) मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. केशवनगर येथील 'द ऑरबिस प्रशाले'चा निकाल १०० टक्के टक्के लागला आहे. कवाना अंकलेकर हिने ९६.६ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला.

पिंपरीतील गोयल गंगा इंटरनॅशनल स्कूलचा निकाल १०० टक्के लागला. आदित्य खानोलकर याने ९६.६ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. डीएव्ही पब्लिक स्कूल औंधचा निकाल १०० टक्के लागल्याची माहिती प्राचार्य सी. व्ही. माधवी यांनी दिली. दिल्ली पब्लिक स्कूलचाही निकाल १०० टक्के लागला. ऋषभ गोयल याने ९८.३ टक्के गुणांसह पहिला क्रमांक पटकावला. अक्षरा इंटरनॅशनल स्कूलचा शंभर टक्के निकाल लागला. कौशिकी कार गुप्ता हिने ९७.२ टक्के गुण मिळवत पहिला क्रमांक पटकावला. विखे पाटील मेमोरियल स्कूलचा निकाल शंभर टक्के लागला असून, आयुषी बर्वे हिने ९८.२ टक्के गुण मिळवून पहिला क्रमांक पटकावला. कल्याणी स्कूलचा निकालही शंभर टक्के लागला असून नयोनिका शर्मा हिने ९७.२ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला.

निगडी प्राधिकरणातील सिटी प्राइड स्कूलचा निकाल शंभर टक्के लागला असून, संकेत ढोरे याने ९७.८ टक्क्यांसह प्रथम स्थान मिळवले. वात्सल्य शाळेचाही निकाल शंभर टक्के लागला त्यात शुभम उपाध्यायने ९३.४ टक्के मिळवत पहिला क्रमांक पटकावला. शंभर टक्के निकाल लागलेल्या ताथवडे येथील ब्लॉसम पब्लिक स्कूलमध्ये पायल हेलांबे हिने ९८ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. ट्रिनिटी इंटरनॅशनल स्कूलचाही निकाल १०० टक्के लागला असून, साईश्रद्धा चिंतल हिने ९५.४ टक्के गुणांसह प्रथम स्थान मिळवले. भुकूम येथील संस्कृती स्कूलचा निकाल शंभर टक्के लागला असून, विदुशी टंडन हिने ९८.२ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला.

दिघी येथील आर्मी पब्लिक स्कूलचा निकालही शंभर टक्के लागला. साक्षी खराडे हिने ९४.८ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. नांदेड सिटी येथील पवार पब्लिक शाळेचा निकाल शंभर टक्के लागला असून, स्नेहल काणे आणि प्रद्युम्न पैठणकर यांनी प्रत्येकी ९६.२ टक्के मिळवून संयुक्तपणे प्रथम क्रमांक पटकावला. खडकी येथील आर्मी पब्लिक स्कूलनेही शंभर टक्के निकाल नोंदवला. सौरभ चव्हाण याने ९७.६ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला, अशी माहिती प्राचार्य आरती शर्मा यांनी दिली. कोथरूडच्या सिटी इंटरनॅशनल स्कूलचे सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, आस्था मुजुमदारने ९७.४ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला.

चंदननगर येथील एअरफोर्स स्कूलचाही निकाल शंभर टक्के लागला. या शाळेत शब्बीर कादरी याने ९८ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. अमनोरा स्कूलनेही शंभर टक्के निकाल नोंदवला असून, श्रेष्ठा श्रीवास्तव व नम्या डिमरी यांनी प्रत्येकी ९८ टक्के गुणांसह संयुक्तपणे प्रथम क्रमांक पटकावला. लॅक्सिकॉन शाळेच्या वाघोली आणि कल्याणीनगर शाखेचा निकालही १०० टक्के लागला. कल्याणीनगर शाखेतून रितिका चॅटर्जी हिने ९६ टक्क्यांसह प्रथम क्रमांक पटकावला. वाघोली शाखेतून अस्मिता दत्ता हिने ९६.६ टक्क्यांसह प्रथम क्रमांक पटकावला. रहाटणीच्या 'एसएनबीपी' शाळेतून दिया गोयल हिने ९८ टक्क्यांसह प्रथम क्रमांक पटकावला.

### दिव्यांगांचेही खणखणीत यश

देहू रोड येथील आर्मी पब्लिक स्कूलनेही १०० टक्के निकाल नोंदवला. या शाळेतून सूरज मोहिते याने ९६.२ टक्के गुणांसह प्रथम येण्याचा मान मिळवला. उल्लेखनीय बाब म्हणजे याच शाळेतील चार दिव्यांग विद्यार्थ्यांनीही विशेष प्राविण्य श्रेणी पटकावली.

